# ख्रिस्ताची सेवा करणाऱ्यांचे आम्ही आमच्या घरांत स्वागत करतो

## मुलांना त्यांच्या घरात इतरांची सेवा करण्यास शिकवा.

मुलांच्या गरजा आणि वयोगटांना अनुरूप कार्यक्रम निवडा.

**प्रार्थना:** "प्रिय प्रभू, मुलांना त्यांच्या घरांत तुझी सेवा करण्याचे मार्ग समजावेत याकरिता कृपा करून साहाय्य कर."

संदेष्ट्यांसाठी खोली तयार करण्याचा वृत्तांत शिकविण्याची तयारी करा. प्रवाशांचे आदरतिथ्य करणाऱ्या स्त्रीला देवाने कसे आशीर्वादित केले ते 2 राजे 4:8-37 मधून वाचा.



पुढील प्रश्नांची उत्तरे द्या. प्रत्येक **प्रश्नावर** उत्तरे दिली आहेत.

- त्या स्त्रीने अलीशासाठी काय केले? *(पाहा वचन 10)*
- अलीशाने त्या स्त्रीसाठी काय केले? *(पाहा वचन 16)*
- त्या मुलाला काय झाले? *(पाहा वचन 20)*
- ती स्त्री मदतीसाठी कोणाकडे गेली? *(पाहा वचन 27)*
- अलीशाने मुलाला मदत करण्यापूर्वी काय केले? *(पाहा वचन 33)*
- अलीशाने मुलासाठी काय केले? *(पाहा वचन 35)*

मोठ्या मुलाने किंवा शिक्षकांनी संदेष्ट्याच्या खोलीचा कथावृत्तांत सांगावा.

2 राजे 4:8-37 मधून कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था करा.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांना तयारीसाठी मदत करावी.
- तुम्ही सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही.

मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी अलीशा, स्त्री, पती व निवेदक ह्या भूमिका कराव्यात

- निवेदकाने कथावृत्तांताचा सारांश तयार करून मुलांना संवाद पाठ करावयास मदत करा.
- अलीशाच्या लहान मुलांनी मुले व सेवक ह्या भूमिका कराव्यात.

लहान मुलांना किंवा प्रौढांनी **मुलगा** व **सेवक** ह्या भूमिका कराव्यात

**निवेदकः** 2 राजे 4:8–16 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग वाचा मग म्हणा, "शूनेम येथील स्त्री आपल्या पतीला काय म्हणते ते ऐका."

**स्त्रीः** "अहो, प्रवासाला जाताना वरचेवर आपल्या घरी येणाऱ्या संदेष्ट्यासाठी मला काही तरी करायचे आहे. आपण त्यांच्याकरिता एखादी खोली बांधू या का? म्हणजे ते इथे असतील तेव्हा त्यांना तिथे राहता येईल."

**पतीः** "कल्पना चांगली आहे मी वरच्या मजल्यावर एक खोली बांधून घेतो."

**अलीशाः** दारावर टकटक करून म्हणा, "आम्ही तुम्हांला भेटायला आलो आहोत."

**स्त्रीः** "कोण अलीशा, या, या, असे आत या! पाहा तुमच्याकरिता आम्ही एक खोली बांधली आहे!"

**अलीशाः** "धन्यवाद अगदी मनापासून आभार मानतो तुमच्या ह्या पाहुणचाराबद्दल तुम्हांला आशीर्वाद देण्याची देवाकडे मी विनंती करणार आहे. तुम्हांला मूलबाळ नाही हे मला ठाऊक आहे. पुढच्या वर्षी तुम्हांला मुलगा होईल."

**निवेदकः** 2 राजे 4:17–25 मधून कथावृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, "मुलगा आपल्या वडिलांना काय म्हणतो ते ऐका."

**मुलगाः** "बाबा, आज मी देखील तुमच्याबरोबर शेतावर येणार,"

**पतीः** "हो बाळा तू येऊन माझ्या कामात मदत कर." (पती व मुलगा धान्याची कापणी करणाऱ्या सेवकांकडे जातात.)

**सेवकः** "सुप्रभात धनी." "देव आपल्याला आशीर्वाद देवो."

**मुलगाः** डोके गच्च धरून तक्रार करा, "आई गं! बाबा माझे डोके प्रचंड दुखत आहे!"

**पतीः** एका सेवकाशी बोला, "याला घेऊन त्याच्या आईकडे जा."

**स्त्रीः** मुलाला धरून ठेवा (तो मृत होऊन खाली पडतो) म्हणा, "सेवक, एक गाढव घेऊन या."

**निवेदकः** 2 राजे 4:26–37 मधून कथावृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा," अलीशा आपल्या सेवकाला गेहजीला काय म्हणतो ते ऐका."

**अलीशाः** "ते पाहा शूनेम येथील ती स्त्री येत आहे. काय झाले समजत नाही.

**स्त्रीः** चालता चालता डोळे पूसा, काहीही न बोलता चालत राहा. अलीशाकडे जाऊन म्हणा, "माझा मुलगा मरण पावला. कृपा करून मला मदत करा."

**अलीशाः** "चला आपण त्याच्याकडे जाऊ." (त्या स्त्री बरोबर तिच्या घरी जा. मुलाच्या बाजुला गुडघे टेकून बसा आणि प्रार्थना करण्याचा अभिनय करा. मग त्या मुलावर झोपा)

**मुलगाः** काही वेळा शिंका आणि मग उठून बसा.

**अलीशाः** "हा घ्या तुमचा मुलगा!"

**निवेदकः** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न विचाराः** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांनी वर दिलेले प्रश्न मोठ्या माणसांना विचारावेत.

प्रत्येक मुलाला कथावृत्तांतातील निरनिराळ्या वस्तू किंवा व्यक्तींचे चित्र काढायला सांगा.

- दगडी घराच्या धाब्यावर बांधलेल्या खोलीचे चित्र काढतील. त्यात एक मेज, खुर्ची, कंदिल, बिछाना, डोके हाताने गच्च धरलेला मुलगा, गाढव किंवा अलीशाच्या काठीचे चित्र काढतील

- शिक्षकांनी खोलीचे चित्र काढून त्यात एक बिछाना, मेज खूर्ची व कंदिल दाखवावा मोठ्या मुलांनी असेच चित्र काढावे.
- मोठ्या मुलांनी चित्र काढण्यासाठी लहान मुलांना मदत करावी
- मुलांनी उपासनेच्या वेळी आपली चित्रे मोठ्या माणसांना दाखवून देवाची सेवा करणाऱ्यांचा खास करून कशा प्रकारे पाहुणचार करावा हे या चित्रावरून दिसते असे स्पष्ट करा.

देवाची सेवा करण्यासाठी आपल्याला आपल्या घरांचा कसा उपयोग करता येतो; याविषयीची इतर उदाहरणे मुलांना सांगू द्या. “लोक देवाची उपासना करण्यासाठी कोणकोणत्या ठिकाणी जातात?” हे ही विचारा.

**कविता:** चार मुलांनी स्तोत्र 24:7-10 यातील प्रत्येकी एकेक वचन म्हणावे.

आपल्या घरांमध्ये देवाची सेवा करणे किंवा देवाच्या उपासनेसाठी आपली घरे खुली करणे याविषयी मोठ्या मुलांना कविता वा गीते लिहिण्यास सांगा.

लहान मुलांनी इफिस 2:19 तर मोठ्या मुलांनी इफिस 2:19-20 ही वचने पाठ करावी

**प्रार्थना:** प्रिय प्रभू, संपूर्ण पृथ्वी तुझी आहे. आमचे घर तुझे आहे. आमच्या घरांतून आमची स्तुती मान्य करून घेतल्याबद्दल धन्यवाद. आमच्या कुटुंबांनी आदरातिथ्य करावे असे तू कर.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net